# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१४२३/२०२२/नंदुरबार**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. खलिल रज्जाक खाटिक<br>रा. नवभारत हौसिंग सोसायटी, मु. पो. ता. नवापुर, जि. नंदुरबार-४२५४१८ | उपचिटणीस (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, नवीन प्रशासकीय इमारत, टोकर तलाव रोड, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार-४२५४१२ | अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, नवीन प्रशासकीय इमारत, टोकर तलाव रोड, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार-४२५४१२ |

**सुनावणी दिनांक –२१/०५/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित | ऑनलाईन उपस्थित | अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०३/०३/२०२२

(२) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत उत्तर दिलेले नाही. व प्रथम अपिल अधिकारी यांनी आज पर्यंत सुनावणी घेतली नाही. तसेच कोणताही आदेश दिलेले नाही.

(३) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जन माहिती अधिकारी व प्रथम अपिल अधिकारी यांच्यावर कलम २० अन्वये शास्ती व दंड करण्यात यावे व मला माहिती मिळवून दयावे हि नम्र विनंती.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०/०९/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि.०१/०१/२०१९ ते आज दिनांक पर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** नवापुर व गव्हाली सिमा तपासनी नाक्यावर होत असलेले भ्रष्टाचार (तक्रार अर्जा व देण्यात आलेले निवेदन) बाबत. १) नवापुर व गव्हाली सिमा तपासनी नाक्यावर होत असलेले भ्रष्टाचार बाबत अनेक लोक प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ता तसेच सामान्य नागरिकांनी आपल्याकडे तक्रार व निवेदन दाखल केले आहे. एकुण आलेले तक्रार अर्जांची व निवेदनाची आपलया मार्फत केलेली कार्यवाहीची सर्व कागदपत्रांची छायांकित प्रती सही शिक्कानिशी देण्यात यावे.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपचिटणीस (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, यांनी दि.१८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, १४ पृष्ठांसाठी रु.२८/- इतके शुल्क भरण्याबाबत अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २६/१०/२०२१

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २६/१०/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, नंदुरबार, यांनी दिनांक १८/११/२०२१,३०/११/२०२१,०९/१२/२०२१ अशी तीन वेळा सुनावणी आयोजीत केली दि.०९/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा उपचिटणीस (गृह शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याचे दिसून येते.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

- **जन माहिती अधिकारी —** यांनी दिनांक ०१/०९/२०२२ रोजी लेखी खुलासा सादर केला असुन त्यामध्ये असे नुमद केले आहे की, खाटीक खलिल रज्जाक, रा. नवापूर ता. नवापूर जि. नंदुरबार यांनी माहितीचा अधिकारांतर्गत दाखल केलेले द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक स्वयंस्पष्ट अहवाल व माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल मागविण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सदरची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.
- १. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली माहिती मिळणेबाबत अर्जदार खाटीक खलिल रज्जाक, रा. नवापूर ता. नवापूर जि. नंदुरबार यांनी दिनांक २०/०९/२०२१ रोजी अर्ज सादर केला असून सदरचा अर्ज दिनांक २१/०९/२०२१ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला आहे.
- २. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जान्वये सन २०१९ ते आज दिनांक पर्यंत नवापूर व गव्हाली सिमा तपासणी नाक्यावर होत असलेले भ्रष्टाचार (तक्रार अर्ज व देण्यात आलेले निवेदन) बाबत माहिती मागविण्यात आली होती.
- ३. त्यानुसार सन २०१९ ते अर्जाच्या दिनांका पर्यंत इकडील शाखेच्या/कार्यालयाच्या अभिलेखात सदर माहितीचा शोध घेतला असता पडताळणीअंती ज्या स्वरूपात उपलब्ध असलेली माहिती त्यांचे दस्तऐवज/कागदपत्रे एकूण १४ पृष्ठात उपलब्ध असल्याचे दिसून आले.
- ४. त्याअनुषंगाने अर्जदार तथा अपिलार्थी यांना इकडील कार्यालयीन पत्र क्र.२०२१/गृह/कक्ष-१/आरटीआय/कावि/१२ नंदुरबार दिनांक १८/१०/२०२१ अन्वये माहिती अधिकाराच्या लेखाशिर्षाखाली माहितीचे प्रती पृष्ठ रक्कम रू २/- याप्रमाणे १४ पृष्ठासाठी रक्कम रु.२८/- भरणा करून चलनाची/पावतीची प्रत मागविण्यात येवून अर्जदार यांचे विनंतीचे अनुषंगाने माहिती पुरविण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. तसेच त्याबाबत अर्जदार यांना दुरध्वनीद्वारे तसेच प्रतिनिधीद्वारे देखील कळविण्यात आले होते. त्याबाबतचा पुरावा या समवेत जोडून सादर केला आहे.
- ५. परंतु, अर्जदार यांनी माहिती मिळणेसाठी माहिती अधिकारांच्या लेखाशिर्षाखाली भरणा केलेला नसल्याने अर्जदार यांना माहिती पुरविता आली नाही.
- ६. तद्नंतर अर्जदार यांनी दिनांक २६/१०/२०२१ रोजी उक्त माहिती अधिकाराच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्याने विनामुल्य माहिती मिळणेसाठी माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ अन्वये प्रथम अपिल दाखल करण्यात आले.
- ७. अर्जदार यांनी दाखल केलेल्या अपिलावर मा. निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी, नंदुरबार यांनी अर्जदार यांचे दोन अपिल दाखल असल्याने अर्जदार यांचा विचार करता दोन्ही अपिल अनुक्रमे दिनांक १८/११/२०२१, ३०/११/२०२१ व ०९/१२/२०२१ रोजी सुनावणी घेण्यात येवून आमचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी संधी देण्यात आली. अपिलार्थी वरील तिन्ही सुनावणीस गैरहजर असल्याने दाखल अपिलावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येवून अर्जदार/अपिलार्थी यांचा अर्ज निकाली काढण्यात आला असला तरी प्रतिवादी म्हणून मला अर्जदार यांना उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य पुरविण्याबाबत आदेश देण्यात आला. त्याबाबतचा आदेश या समवेत जोडून सादर केला आहे.

- ८. मा.अपिलीय अधिकारी यांचेकडील आदेश दिनांक १०/१२/२०२१ च्या अनुषंगाने अर्जदार यांना उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली आहे. त्याबाबतचा पुरावा या समवेत जोडून सादर केला आहे.
- महोदय, अर्जदार तथा अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज करणेत येवून हवी असलेल्या माहितीसाठी रक्कम न भरता विनामुल्य माहिती मिळणेसाठी अपिल केल्याचे दिसून येते. वारंवार संधी देवून देखील अर्जदार यांनी माहिती उपलब्ध करून घेतलेली नाही. अपिलाचा आदेशावर अर्जदार यांनी माहिती घेतलेली आहे. त्यात माझा कुठलाही जाणीव पुर्वक माहिती न देण्याचा हेतु नव्हता. अर्जदार यांना नियमानुसार माहिती उपलब्ध करून देण्याचा मी परिपुर्ण प्रयत्न केला आहे. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देखील त्यांनी आपणाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे. तरी सदरचा अर्ज निकाली काढणेत यावा हि नम्र विनंती.
- **प्रथम अपीलीय अधिकारी** – दि.०९/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये कार्यालयात उपलब्ध माहिती विना मुल्य देण्यात यावी असे आदेशित केले असल्याचे दिसून येते.

**६. निष्कर्ष –**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपचिटणीस (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शुल्क भरण्याबाबत कळविले असल्याचे दिसून येते.

(२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, नंदुरबार, यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दि. ०९/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन कार्यालयातील उपलब्ध माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी असे आदेश पारित केले असल्याचे दिसून येते.

(३) प्रथम अपिल निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली १४ पृष्ठांची माहिती दि. १०/१२/२०२१ च्या पत्रान्वये विनामुल्य दिली असल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१४२३/२०२२/ नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** 0390 19 SEP 2025